स्थळ. 3

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S).

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** मोहोळ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0690 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/10/2024 23:12

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 07/10/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/10/2024

**Time From (वेळेपासून):** 11:47 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/10/2024 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 045

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/10/2024 22:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत अधिकारी खवणी, ता

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अणासाहेब भगवान भोसले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1967

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खवणी, ता मोहोळ, जि सोलापूर,मोहोळ ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खवणी, ता मोहोळ, जि सोलापूर,मोहोळ ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9860709604

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सोमनाथ चांगदेव सोनवणे | | | 1. ग्रामपंचायत अधिकारी खवणी, ता ,मोहोळ ,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 07/10/2024 मी अणासाहेब भगवान भोसले,वय-57 वर्षे, व्यवसाय-शेती,रा.मु.पो.खवणी, ता.मोहोळ,जि.सोलापूर,मो.नं.9860709604 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणी माझी पत्नी, मुलगा यांच्यासह राहण्यास असुन मौजे खवणी येथे शेती व्यवसाय करतो,त्यावर माझा व माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवतो.माहे मार्च-एप्रिल 2023 मध्ये शासनाचे गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेच्या माध्यमातून पोखरापूर येथील लघू पाटबंधारे तलावामधून उदय बहुउद्देशीय सामाजिक संस्था मोहोळ व डॉ.विठ्ठलराव विखे पाटील डेव्हलपमेंट फाऊंडेशन,पुळूज,ता.पंढरपूर या अशासकीय संस्थेकडून गाळ काढण्यात आले होते.शासनाच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत तलावामधून काढलेला गाळ वाहून घेऊन शेतामध्ये घालून घेण्याबाबत ग्रामपंचायतीच्या नोटिस बोर्डावर लेखी सुचना दिले होते,त्यानुसार सदर गाळ वाहून नेऊन शेतामध्ये पसरविण्यात आल्यानंतर पाटबंधारे विभागाकडून पंचनामे करून संबंधित शेतक-यांना अनुदान वाटप करण्यात येत असल्याने लघू पाटबंधारे तलाव पोखरापूर येथून काढलेला गाळ मी टिपर व ट्रॅक्टरच्या माध्यमातून स्वखर्चाने वाहून नेऊन माझ्या शेतामध्ये पसरविले होते सदरबाबत पाटबंधारे विभागाकडून पंचनामे करण्यात आल्यानंतर मला अनुदान मिळेल असे सांगण्यात आले होते.त्याअनुषंगाने काही दिवसापुर्वी जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग,सोलापूर यांच्याकडून गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत पुर्ण करण्यात आलेल्या कामांचे शेतक-यांना देय असलेली अनुदानाचे निधी ग्रामपंचायतीस वितरीत करणेबाबत आदेश प्राप्त झाले होते आणि गावातील ब-याच लोकांना अनुदानाची रक्कम मिळाली आहे. त्याअनुषंगाने आज सकाळी नेहमीप्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयासमोर मोकळ्या आवारात थांबलेलो असताना ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे हे ग्रामपंचायत कार्यालयाजवळ येऊन कार्यालयात जात असताना मी त्यांच्याकडे जाऊन मला मंजुर झालेल्या अनुदानाच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी मला अनुदान मंजुर झाले असून अनुदानाची रक्कम डी.सी.सी बँकेचे खाते असल्यास थेट खात्यामध्येआर.टि.जी.एस करतो आणि डि.सी.सी बँकेचे खाते नसल्यास अनुदानाचे रक्कम चेक द्वारे देतो असे सांगुन त्यासाठी 750/-रू.द्यावे लागतील असे सांगितले.त्यानंतर मी माझा चुलत भाऊ बाळासाहेब भोसले यांच्याशी सदरबाबत चर्चा केली असता त्यांनी अनुदान रकमेच्या चेककरीता कोणतीही शासकीय फि अगर रक्कम आकारली जात नसल्याचे मला सांगितले.त्यावरून ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे हे माझ्याकडे चेक अदा करणेकरीता लाचेची मागणी करीत असल्याचे मला लक्षात आले.त्यामुळे मी माझा चुलत भाऊ बाळासाहेब भोसले यांना विनंती केल्यावरून त्यांनी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोनि पिंगुवाले यांना फोन करून लाच मागणीची तक्रार सांगितली.त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी सुमारे 11.15 वा.चे सुमारास मोहोळ-पंढरपूर रोडवर खवणी फाटाजवळ येऊन थांबण्यास सांगितले.त्याप्रमाणे मी सदरठिकाणी जाऊन थांबलो असता काहीवेळाने पोनि पिंगुवाले हे शासकीय वाहनातून त्यांचा स्टाफ व दोन शासकीय पंच यांच्यासह येऊन माझी भेट घेतली.त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी मला शासकीय वाहनात बोलावून घेऊन दोन्ही पंचांची व माझी आपसात ओळख करून दिली. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी मला माझी तक्रार विचारली असता,मी वरीलप्रमाणे माझी तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली.सदरची लेखी तक्रार पोनि पिंगुवाले व पंचानी वाचून त्यावर त्यांनी सह्या केल्या.सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि पिंगुवाले यांनी मला ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांच्याकडे तीन गावाचे कार्यभार असून आज सोमवारी ते मौजे खवणी ग्रामपंचायत कार्यालयाचे कामकाज पाहण्यासाठी कार्यालयात असल्याचे सांगितले.त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकले.त्यानंतर ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.01 हानवते व मला सर्व आवश्यक सुचना दिल्या आणि व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकावून 11.47 वा चे सुमारास माझ्याकडील मोटारसायकलवरुन रवाना केले. पंच क्र.01

हानवते व मी असे दोघे खवणी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांची भेट घेऊन त्यांचेशी चर्चा करत असताना त्यांनी मला माझ्या घराची पाणीपट्टीची रक्कम वजा करून रक्कम देतो असे सांगुन त्याबाबत सुरूवातीस चर्चा केली.त्यावेळी मी त्यांना नाय नाय दोन हजार आता भरून घ्या बाकीच दिवाळीत आमची वाटणी झाल्यावर बाकीचे भरतो असे सांगितले. त्यानंतर पुन्हा मी किती हाय रक्कम.किती आलीय माझी.वजा होऊन किती येतीय असे विचारलो तेव्हा श्री सोनवणे यांनी पस्तीस सातशे पन्नास हाय. सत्तावीस नऊशे पन्नास येतेत.म्हणले अठ्ठावीस हजार येतेत पन्नास रूपय कमी.असे म्हणाले. त्यावेळी मी चेक देताय का मग.का कॅश असे विचारल्यावर त्यांनी हे काय आरटिजीएस करतोय.आता डिसीसीची किती खाते हाय बघणार.लगेच तुमच्या बँकेत तुमच्या खात्यात जमा होणार 10 मिनिटात असे सांगितले.तेव्हा पाणीपट्टीची रक्क्म माझ्या एकटयाकडून वसूली होणार असल्याने मी माझ्या भावंडांना पाणीपट्टी रकमेबाबत विचारून सांगतो असे म्हणून तिथून परत निघालो. त्यानंतर मी पोनि पिंगुवाले थांबलेल्या ठिकाणी गेलो आणि घडलेली हकिकत सांगितली.पोनि पिंगुवाले यांनी पंच क्र. 01 हानवते व मला घडलेली हकिकत विचारून घेतली त्यानंतर त्यांनी व्हॉईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये मी व पंचाने सांगितल्याप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले.मला मंजुर झालेल्या अनुदानाच्या रकमेतून पाणीपट्टीची रक्कम वजा करून उर्वरित रकमेचे चेक देणार असल्याबाबत ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांनी सांगितल्याने त्याबाबत मी माझ्या भावंडांशी चर्चा करून परत येतो असे सांगितल्याने त्यावेळी श्री सोनवणे हे माझ्याकडे लाचेची मागणी करण्याची शक्यता आहे, त्यामुळे पोनि पिंगुवाले यांनी ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांची पुन्हा पडताळणी करण्याच्या अनुषंगाने मला व पंच क्र.01 हानवते यास सुचना देऊन माझ्या गळ्यात व्हॉईसरेकॉर्डर अडकावून 13.05 वा चे सुमारास माझ्याकडील मोटारसायकलवरून रवाना केले. पंच क्र.01 हानवते व मी असे दोघे खवणी ग्रामपंचायत कार्यालयात परत जाऊन ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करत असताना ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांनी मला माझ्या घराचे खणपट्टी व पाणीपट्टी याचे 8420/-रू बाकी असून सदरची रक्कम मंजुर अनुदानाच्या रकमेतून वजा करून उर्वरित रकमेची चेक देतो असे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला साडेसातशे रूपय द्या असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना कशाचे असे विचारलो असता ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांनी मला ऑडिटच.हे ऑडिटच आहे असे सांगितले. त्यावर मी त्यांना ऑडिटची पावती असे विचारले असता त्यांनी पुन्हा पावती नसती ऑडिटची असे सांगितले. त्यानंतर ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांनी ऑडिटची पावती कुठ, तुम्ही ऑडिट वेळेस बोलावतो मी तुम्हाला. ऑडिट करताना लागली तर त्याला पावती मागवतो.थोडक्यात बेकायदेशीर आहे.लाच आहे असे समजा.साडेसातशे रूपये असे म्हणून माझ्याकडे स्पष्टपणे 750/-रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी त्यांना यातनंच वजा करून घ्या असे म्हणालो असता त्यांनी त्याज्यातून वजा करून घेऊ शकत नाही मी.असे सांगितले.त्यावर मी आता जवळ कुठले पैसे अण्णासाहेब एवढे असे श्री सोनवणे यांना म्हणालो असता, त्यांनी मला साडेसातशे रूपय जवळ नाही अस नाही असे बोलले. त्यावेळी त्यांनी मला कोणाकडून तरी उसने घ्या काही करा असे म्हणून लाचेची रक्कम देण्यास सांगितले.सदरवेळी मी घरी जाऊन पैसे घेऊन येतो असे सांगुन पोनि पिंगुवाले यांची भेट घेतली आणि झालेली हकिकत सांगितली.त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी व्हॉईसरेकॉर्डींगमध्ये झालेले संभाषण फॉरवर्ड-बॅकवर्ड करून ऐकले. त्यामध्ये ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांनी 750/-रू लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून मी हजर केलेले रक्कम 750/- रुपयांच्या नोटांना त्यांचे स्टाफच्या हस्ते अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी मला,दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकावून पंच क्र.01 हानवते व मला माझ्या मोटारसायकलवरून ग्रामपंचायत कार्यालय खवणी येथे रवाना केले,सदरवेळी आमचे पाठोपाठ पोनि पिंगुवाले, पंच क्र. 02 आवताडे आणि सापळा पथकातील अंमलदार शासकीय वाहनातुन आमच्या पाठीमागे आले. मी व पंच क्र.01 हानवते ग्रामपंचायत कार्यालयात गेलो त्यावेळी पोनि पिंगुवाले,पंच क्र.02 आवताडे व सापळा पथकातील अंमलदार हे ग्रामपंचायत कार्यालयाच्या समोर व बाजुच्या जि.प शाळेच्या परिसरात सापळा लावुन थांबले. त्यानंतर मी व पंच क्र.01 हानवते असे दोघे ग्रामपंचायत कार्यालयात गेलो आणि ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांना नमस्कार म्हणालो. त्यावेळी ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांनी मला बघून माझ्याकडे हाताने इशारा करून पैश्याची मागणी केली असता मी त्यांना माझ्या शर्टाचे वरील डाव्या बाजुच्या खिशात अँन्थ्रासीन पावडर लावून ठेवलेले 750/-रू.च्या नोटा काढून दिले असता त्यांनी ते नोटा त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या शर्टाच्या डाव्या बाजुच्या वरील खिशात ठेवले. त्यावेळी त्यांनी मला आरामात दिले असते.नंतरबी दिले असते असे म्हणाले.त्यानंतर त्यांनी माझ्या अनुदानाच्या रकमेतून 8420/- रू.मिळकत कर वसूल करून घेण्याबाबतचा फॉर्म तयार करून त्यावर

माझी सही घेतली.त्यानंतर त्यांनी मला सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे 27330/-रू रकमेचे चेक दिले. त्यावेळी मी त्यांना चला येऊ का अण्णासाहेब असे बोललो असता श्री सोनवणे यांनी मला रागाला जाऊ नका असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच क्र.01 हानवते ग्रामपंचायत कार्यालयातून बाहेर आलो. तेव्हा मी ठरल्याप्रमाणे माझा चष्मा काढून लाच स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावरून ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात सापळा लावून थांबलेले सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार माझ्याजवळ आले त्यानंतर आम्ही सर्वजण ग्रामपंचायत कार्यालयात गेलो.सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी माझ्या गळ्यातील रेकॉर्डर बंद करून काढून घेतला आणि लाचेची रक्कम कोणी स्विकारले याबाबत विचारणा केली असता मी ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांना दाखविले. त्यावेळी पोनि पिंगुवाले व सापळा पथकातील अंमलदार यांनी त्यांना ताब्यात घेतले. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी ग्रामपंचायत अधिकारी श्री सोनवणे यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सोमनाथ चांगदेव सोनवणे, वय-36 वर्षे,पद-ग्रामपंचायत अधिकारी भांबेवाडी, अतिरीक्त कार्यभार खंवणी व घोडेश्वर ता.मोहोळ, जि. सोलापूर राहणार- मु.पो.सौंदणे,ता.मोहोळ,जि.सोलापूर असे सांगितले. त्यानंतर सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही शासकीय विश्रामगृह मोहोळ येथे पुर्ण करण्यात आले. तरी दि.07/10/2024 रोजी 11.47 ते 13.52 वा चे दरम्यान लोकसेवक सोमनाथ चांगदेव सोनवणे,वय-36 वर्षे,पद- ग्रामपंचायत अधिकारी खवणी,ता.मोहोळ,जि.सोलापूर राहणार-मु.पो.सौंदणे,ता.मोहोळ,जि.सोलापूर यांनी ग्रामपंचायत कार्यालय खवणी येथे जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग,सोलापूर यांच्याकडून गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत पुर्ण करण्या आलेल्या कामांचे देय असलेली अनुदानाचे मला मंजुर झालेल्या रकमेचे चेक अदा करण्यासाठी कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन 750/- रू लाच मागणी करून ते स्वत:स्विकारून बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sureshkumar Nanasaheb Raut(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Bhosale

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Bhosale

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Suresh kumar ... as
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अंमलदार
मोहोळ, पोलीस स्टेशन

FIR
निनामूल्य
मिळाली
Bhosale